# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:31.07.2025** **वार:गुरुवार**

---

1. ऑपरेशन महादेव अंतर्गत भारतीय सैन्य आणि सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईची केंद्रिय गृहमंत्र्यांकडून प्रशंसा
2. भारतीय उत्पादनांवर 25 टक्के कर लागू करण्याच्या अमेरिकेच्या घोषणेनंतर राष्ट्रहिताच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचं सरकारचं प्रतिपादन
3. पृथ्वी निरीक्षणासाठी इस्रो आणि नासानं संयुक्तरित्या विकसित केलेल्या निसार उपग्रहाचं यशस्वी प्रक्षेपण आणि
4. भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतील पाचवा आणि अंतिम सामना आजपासून

**<u>गृहमंत्री-अमित शहा राज्यसभा</u>**

नरेंद्र मोदी सरकारच्या काळात जम्मू आणि काश्मीर दहशतवादमुक्त होईल असा विश्वास केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला. ते काल राज्यसभेत ऑपरेशन सिंदूरबाबतच्या चर्चेला उत्तर देत होते. दहशतवाद्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल आणि दहशतवाद्यांनी उभ्या केलेल्या पायाभूत सुविधा जमीनदोस्त केल्या जातील असं शहा म्हणाले. नुकतंच पहलगाम हल्ल्यात सामील असलेल्या तीन दहशतवाद्यांना ठार करण्यात आलं. ऑपरेशन महादेव अंतर्गत भारतीय सैन्य आणि सुरक्षा दलांनी केलेल्या या कारवाईची गृहमंत्र्यांनी प्रशंसा केली. पहलगाम हल्ल्यानंतर लगेचच सरकारनं पाकिस्तानच्या विरोधात सिंधू जल करार आणि व्हिसाला स्थगिती यासारखे कठोर उपाय अवलंबले असं त्यांनी नमूद केलं. पाकव्याप्त काश्मीरसह पाकिस्तानमधले दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यासाठी सैन्याला कारवाईचं पूर्ण स्वातंत्र्य दिलं होतं असं सांगून पाकिस्ताननं ऑपरेशन सिंदूर थांबवण्याची विनंती केली होती असं त्यांनी स्पष्ट केलं. दरम्यान गृहमंत्र्यांचं भाषण सुरू असताना पंतप्रधानांनी उत्तर द्यावं अशी मागणी करत विरोधकांनी सभात्याग केला.

**<u>अमेरिका-कर</u>**

उद्यापासून भारतीय उत्पादनांवर 25 टक्के कर लागू करण्याच्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या घोषणेची भारतानं गंभीर दखल घेतली आहे. राष्ट्रहिताच्या सुरक्षेसाठी सरकार आवश्यक त्या सर्व उपाययोजना सरकार करेल असं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. भारत आणि अमेरिकेदरम्यान निष्पक्ष, संतुलित आणि परस्परहिताच्या द्विपक्षीय व्यापार कराराबाबत वाटाघाटी सुरू आहेत. मात्र सरकारनं सर्वोच्च प्राधान्य शेतकरी, उद्योजक तसंच सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योगांच्या हिताला चालना देणं आणि त्यांच्या हिताचं रक्षण करणं याला दिल्याचं या निवेदनात म्हटलं आहे. दरम्यान, अमेरिकेच्या या निर्णयाबाबत फिक्की या औद्योगिक संघटनेनं नाराजी व्यक्त केली आहे. या निर्णयाचा देशाच्या निर्यातीवर परिणाम होऊ शकतो अशी प्रतिक्रिया फिक्कीचे अध्यक्ष हर्षवर्धन अगरवाल यांनी व्यक्त केली आहे.

**<u>अमेरिका फेडरल</u>**

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह संस्थेनं अल्प मुदतीसाठीच्या व्याजदरात कोणतेही बदल केले नाहीत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वारंवार व्याज दरात कपात करण्याचं आवाहन करुनही या वर्षात सलग पाचव्यांदा

व्याजदर स्थिर ठेवण्यात आले. गेल्या वर्षी व्याजदरात तीन वेळा कपात करुन तो सुमारे 4 पूर्णांक 3 दशांश टक्के करण्यात आला.

**<u>निसार</u>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रो आणि अमेरिकेच्या नासा संस्थेनं संयुक्तरित्या विकसित केलेला निसार उपग्रह काल त्याच्या निर्धारित कक्षेत यशस्वीपणे स्थापन करण्यात आला. भारत आणि अमेरिका यांच्यातील अंतराळ क्षेत्रातल्या सहकार्याचा हा पहिलाच उपक्रम आहे. निसारची दुहेरी रडार यंत्रणा, एल बँड आणि एस बँड यंत्रणा यामुळे हा पृथ्वीच्या पृष्ठभागावरची अचूक माहिती देणारा उपग्रह ठरेल. पृथ्वी निरीक्षण अभियानातला हा ऐतिहासिक टप्पा असल्याचं इस्रोनं म्हटलं आहे. निसार उपग्रहाच्या यशस्वी प्रक्षेपणाबद्दल केंद्रिय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी त्यात सहभागी असलेल्या प्रत्येकाचं अभिनंदन केलं आहे.

**<u>कवच</u>**

रेल्वे सुरक्षेसाठी सुरू करण्यात आलेली आणि भारतात विकसित केलेली कवच 4 ही अत्याधुनिक यंत्रणा कोटा ते मथुरा दरम्यानच्या भागात वापरण्यासाठी सज्ज आहे अशी घोषणा काल सरकारनं लोकसभेत केली. देशातल्या रेल्वे सुरक्षा यंत्रणेच्या आधुनिकीकरणातला हा महत्त्वाचा टप्पा आहे असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**<u>हप्ता</u>**

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा 20 वा हप्ता परवा दोन ऑगस्टला दिला जाणार आहे. केंद्रीय कृषी शिवराज सिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर ही माहिती देण्यात आली. 2019 मध्ये सुरू झालेल्या या योजनेअंतर्गत आतापर्यंत 19 हप्त्यांमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यात 3 लाख 69 हजार कोटी रुपये हस्तांतरित झाले आहेत.

**<u>बँकिंग कायदा</u>**

बँकिंग सुधारणा कायदा 2025 उद्यापासून अमलात येणार आहे. बँकिंग क्षेत्रातल्या प्रशासकीय मानकांमध्ये आणि ठेवीदार, गुंतवणूकदारांच्या सुरक्षेमध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने हा कायदा करण्यात आला. सार्वजनिक बँकांच्या लेखापरीक्षणात सुधारणा करणे आणि सहकारी बँकांच्या संचालकांच्या कार्यकाळात वाढ करणे हादेखील या कायद्याच्या अंमलबजावणीचा हेतू असल्याचं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>एआय-शिखर परिषद</u>**

पुढच्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या कृत्रिम बुद्धीमत्ता प्रभाव शिखर परिषदेचं आयोजन भारत करणार आहे. केंद्रिय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल संसदेत ही माहिती दिली. आरोग्य, शिक्षण, कृषी, हवामान बदल आणि प्रशासन यासारख्या वास्तव जगातल्या समस्यांचा सामना करण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर या संकल्पनेवर परिषदेत भर देण्यात येईल असं त्यांनी सांगितलं. कृत्रिम बुद्धीमत्तेशी संबंधित पायाभूत सुविधांचा विस्तार करण्याचं काम सरकार करत आहे. यामध्ये ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिटच्या वापरात वाढ आणि एआयकोष डेटासेटस मंचाची क्षमता वाढवणे यांचा समावेश असल्याचं ते म्हणाले.

**<u>मणिपूर</u>**

मणिपूरमधल्या राष्ट्रपती राजवटीला आणखी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यास काल लोकसभेनं मंजूरी दिली. गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी याबाबतचा ठराव सभागृहात मांडला. राष्ट्रपती राजवटीनंतर हिंसाचाराची केवळ एकच घटना घडल्याचं त्यांनी सांगितलं. गेल्या 13 फेब्रुवारीपासून मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे.

**अमेरिका-कोरिया करार**

दक्षिण कोरियातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या मालावर 15 टक्के कर आकारण्यात येईल. दोन्ही देशांमधे याबाबतचा करार करण्यात आल्याची माहिती अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. हा करार झाला नसता तर दक्षिण कोरियासाठीदेखील उद्यापासून 25 टक्के आयातशुल्क लागू झाले असते.

**महिला-खगोल शास्त्रज्ञ**

युनायटेड किंग्डममध्ये पहिल्यांदाच राजघराण्याचा खगोलशास्त्रज्ञ म्हणून एका महिलेची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रोफेसर मिशेल डोहर्टी यांना ही ऐतिहासिक संधी मिळाली आहे. राजघराण्याचा खगोलशास्त्रज्ञ हे एक प्रतिष्ठीत पद असून 1675 पासून आतापर्यंत साडेतीनशे वर्षांच्या काळात कधीच महिलांना ही संधी मिळाली नव्हती. पारंपरिकरित्या युकेच्या राजघराण्याला खगोलशास्त्राबाबत सल्ला देणे आणि लोकांची अंतराळ तसंच विज्ञान क्षेत्रातली रुची वाढवण्याचं काम या पदावरील व्यक्तीकडून केलं जातं. प्रोफेसर डोहर्टी यांनी नासाच्या कासिनी अभियानात काम केलं होतं.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतील पाचवा आणि अंतिम सामना आज ओव्हल इथल्या मैदानावर सुरु होत आहे. मालिकेतील चौथा सामना अनिर्णीत राहिल्यामुळं सध्या इंग्लड 2-1 असा आघाडीवर आहे. आजपासून सुरु होणाऱ्या सामन्यात विजय प्राप्त करून भारताला मालिकेत बरोबरी साधण्याची संधी आहे. नाणेफेकीचा कौल महत्वाचा असून गेल्या चार सामन्यात एकदाही नाणेफेकीचा कौल भारतीय कर्णधार शुभमन गिलच्या बाजूनं लागला नाही.

**चॅम्पियन्स स्पर्धा**

भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानविरुद्ध खेळण्यास नकार दिल्यानंतर वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजंड्सच्या आयोजकांनी भारतीय चॅम्पियन्स आणि पाकिस्तानी चॅम्पियन्स यांच्यातील उपांत्य सामना रद्द केला आहे. दहशतवाद्यांना पाठिंबा आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानची भूमिका यामुळं भारतीय संघानं खेळातून माघार घेतली आणि काल आयोजकांना आपला निर्णय कळवला.

**हवामान**

हिमाचल प्रदेश आणि पूर्व राजस्थानमध्ये आज अतीवृष्टी होण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. बिहार, छत्तीसगड, जम्मू काश्मीर, लडाख, ओडिशा, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि ईशान्येकडील राज्यांच्या काही भागात मुसळधार पाऊस पडेल. तमिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराइकलमध्ये हवामान उष्ण आणि दमट असेल असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**